MHBU160010522022

| | | |
|---|---|---|
| दाखल दिनांक | | २०/१०/२०२२ |
| नोंदणी दिनांक | | २०/१०/२०२२ |
| निकाल दिनांक | | १६/०६/२०२५ |
| कालावधी | | ०२ वर्ष- ०७ महिने- २६ दिवस |

**भाग – अ**

**प्रपत्र क्र.३२**

(न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)

(फौजदारी नियमावलीचे प्रकरण – ६ परीच्छेद क्र.४४ (I))

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्रं.१, मोताळा, जि. बुलडाणा यांचे न्यायालयात**
(प्रभारी पिठासिन अधिकारी : सतिशकुमार श्री. गायकवाड)
**न्यायनिर्णय**
(घोषीत दिनांक – १६/०६/२०२५)

| | | |
|---|---|---|
| | संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ६७१/२०२२ | निशाणी - १४ खाली |
| | प्रथम खबर अहवाल क्रमांक ३४६/२०२२ | पो.ठा. बोराखेडी. |
| **अभियोगपक्ष** | | महाराष्ट्र सरकार तर्फे,<br>पोलीस ठाणे प्रमुख, पो.ठाणे, बोराखेडी,<br>ता. मोताळा, जि. बुलडाणा. |
| अभियोगपक्षातर्फे | | सहा. सरकारी अभियोक्ता चव्हाण. |
| **आरोपी** | | श्रीकृष्ण केवलसिंग सोळंके,<br>वय : ३१ वर्षे, धंदा : मजुरी,<br>रा. खरबडी, ता. मोताळा,जि. बुलडाणा. |
| आरोपीतर्फे | | विधिज्ञ एस.जी. सोनुने. |

**भाग – ब**

(फौजदारी नियमावलीचे परीच्छेद क्र.४४ (ii))

| | | |
|---|---|---|
| १ | गुन्हा घडल्याचा दिनांक | १४/०८/२०२२ |
| २ | प्रथम खबर अहवाल दिनांक | १४/०८/२०२२ |
| ३ | दोषारोपपत्र दाखल झाल्याचा दिनांक | २०/१०/२०२२ |
| ४ | दोषारोप निश्चिती दिनांक | १६/१२/२०२४ |
| ५ | पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | ०५/०३/२०२५ |

| | | |
|---|---|---|
| ६ | न्यायनिर्णय राखीव केल्याचा दिनांक | निरंक |
| ७ | न्यायनिर्णयाचा दिनांक | १६/०६/२०२५ |
| ८ | दोषसिध्दी आदेशाचा दिनांक असेल तर | निरंक |

**<u>आरोपीचा तपशील</u>**

| आरोपींची श्रेणी | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामीन दिनांक | गुन्ह्याचे कलम | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा सुनावली | बंदीवान म्हणून असलेला कालावधी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२८ करीता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीकृष्ण केवलसिंग सोळंके | समजपत्रावर सोडले | २०/१०/२२ | ६५(ई) म.दा.क. | निर्दोष | निरंक | निरंक |

प्रस्तुतचा खटला वर नमुद आरोपी याचे विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) नुसार चालला.

**मुददे व निष्कर्ष**

२) दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. साक्षीपुरावे व संचीकेचे अवलोकन केले. उभयपक्षांचा युक्तीवाद व प्रकरणाचे स्वरुप पाहता खालील मुददे विचाराधीन येतात. सदर मुदयांचे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविण्यात आले आहेत.

| अ.क्र. | मुददे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | आरोपी हा विनापरवाना व बेकायदेशीररित्या १५ नग देशी दारु टँगो पंच कंपनीच्या बाटल्या प्रत्येकी १८० मि.ली.ची चोरटी विक्री करण्याच्या उददेशाने बाळगतांना मिळुन आला ही बाब अभियोगपक्षाने सिध्द केली आहे काय ? | : | नाही. |
| २. | अंतीम आदेश काय ? | : | आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

३) अभियोगपक्षाने आरोपी विरुध्द गुन्हा सिध्द करण्याच्या हेतुने फक्त सा.क्र.१ पंच समाधान काशीनाथ तेलंग याला तपासले आहे. अभियोगपक्षाने महत्वाचे साक्षीदार तपासल्यामुळे अभियोगपक्षाचा पुरावा निशाणी ०१ वर आदेश पारित करुन बंद करण्यात आला आहे.

४) आरोपीविरुध्द गुन्हयाच्या अनुषंगाने पुरावा न आल्यामुळे आरोपीचे कलम ३१३ फौजदारी प्रक्रिया संहिते अंतर्गत बयाण नोंदविण्यात आले नाही. त्याबाबतचा आदेश निशाणी ०१ वर पारित करण्यात आला आहे.

## मुददा क्रमांक ०१ करीता

५) सा.क्र. १ समाधान काशीनाथ तेलंग याने त्याच्या साक्षीत असे कथन केले की, तो आरोपीला ओळखत नाही. पोलीसांनी त्याला पंच म्हणुन कोठेही बोलावले नव्हते. त्याचे समक्ष आरोपीचे ताब्यातुन काहीही जप्त केले नाही. त्याने घटनास्थळ वजा जप्ती पंचनाम्यावरील सही व त्यातील मजकुर स्पष्टपणे नाकारला आहे. अभियोगपक्षाने सा.क्र.१ समाधान याला फितुर घोषीत करुन त्यांचा उलटतपास नोंदविला. परंतु, अभियोगपक्षास सहाय्यक असे पटलावर काहीही आले नाही.

६) अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांच्या साक्षीचे बारकाईने अवलोकन करण्यात आले. जप्ती पंच हा प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असतो. त्यामुळे त्याने अभियोगपक्षास अनुकुल कथन करणे आवश्यक असते. परंतु, सा.क्र.१ समाधान याने अभियोग पक्षास समर्थन दिले नाही. त्यामुळे अभियोगपक्षाच्या कथानकाविषयी माझे मनात संशय उत्पन्न होतो.

७) वर चर्चीलेल्या विवेचनावरुन असे निदर्शनास येते की, सदर प्रकरणात जप्ती पंच सा.क्र.१ समाधान हा अभियोगपक्षास अनुकुल असे काहीही कथन करीत नाही. त्यामुळे मी अशा निष्कर्षास येतो की, अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द लावण्यात आलेला दोषारोप निःसंशयपणे सिध्द केला नाही. सबब, दिनांक १४/०८/२०२२ रोजी १५.४० ते १६.१० वाजताचे दरम्यान पुजा किराणा दुकानासमोर, मौजे खरबडी, ता.मोताळा येथे, आरोपी हा विनापरवाना व बेकायदेशीररित्या १५ नग देशी दारु टँगो पंच कंपनीच्या बाटल्या प्रत्येकी १८० मि.ली.ची चोरटी विक्री करण्याच्या उददेशाने बाळगतांना मिळुन आला ही बाब अभियोगपक्षाने निःसंशयपणे सिध्द केली नाही. यास्तव, मी मुद्दा क्रमांक ०१ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

## मुद्दा क्रमांक ०२ करीता

८) वर नमुद केल्याप्रमाणे आरोपी हा सबळ पुराव्याअभावी प्रस्तुत प्रकरणातुन निर्दोष मुक्त करण्यास पात्र आहे. संपुर्ण संचिकेचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, पोलीसांनी १५ नग देशी दारु टँगो पंच कंपनीच्या बाटल्या प्रत्येकी १८० मि.ली. जप्त केल्या होत्या. त्यातील एक बॉटल ही नमुन्याकरीता राखुन ठेवली होती. उर्वरित १४ नग देशी दारु टँगो पंच कंपनीच्या बाटल्या प्रत्येकी १८० मि.ली. राज्य उत्पादन शुल्क, बुलडाणा यांचेकडे विल्हेवाटीकरीता पाठविण्यात यावी. जप्त करण्यात आलेली एक वायरची थैली विनामुल्य असल्यामुळे आव्हान कालावधीनंतर नष्ट करण्यात यावी. यास्तव, मी मुद्दा क्र. ०२ चे संबंधाने खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१) आरोपी नामे श्रीकृष्ण केवलसिंग सोळंके याची महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ई) च्या अपराधातुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२) उर्वरीत १४ नग देशी दारु टँगो पंच कंपनीच्या बाटल्या प्रत्येकी १८० मि.ली. योग्य त्या विल्हेवाटीसाठी आव्हान कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क, बुलडाणा यांच्याकडे वर्ग करण्यात याव्यात.

३) जप्त करण्यात आलेली एक वायरची थैली विनामुल्य असल्यामुळे आव्हान कालावधीनंतर नष्ट करण्यात यावी.

४) फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ च्या पुर्ततेकरीता आरोपीचे वैयक्तिक व जामीनदाराचे बंधपत्रे ०६ महिन्याच्या कालावधीपर्यंत कायम करण्यात येतात.

५) न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.

SATISHKUMAR SHRIPATRAO GAIKWAD
Digitally signed by SATISHKUMAR SHRIPATRAO GAIKWAD
Date: 2025.06.16 17:08:15 +0530

दिनांक :- १६/०६/२०२५

स्थळ :- मोताळा.

(सतिशकुमार श्रीपतराव गायकवाड)
प्र. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्रं.१,
मोताळा, जिल्हा बुलडाणा.

## <u>भाग – क</u>

(फौजदारी नियमावलीचे परीच्छेद क्र.४४ (iii))
अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

अ. <u>अभियोग पक्ष</u> :-

| अनु क्रं. | साक्षीदारांची नावे | निशाणी | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | समाधान काशीनाथ तेलंग | १४ खाली | पंच |

ब. <u>बचाव पक्षाचे साक्षीदार असतील तर</u> :-

| अनु क्रं. | साक्षीदारांची नावे | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

क. <u>न्यायालयीन साक्षीदार असतील तर</u> :-

| अनु क्रं. | साक्षीदारांची नावे | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयीन निशाणी दिलेल्या कागदपत्रांची यादी

अ. <u>अभियोग पक्ष</u> :-

| अनु क्रं. | निशाणी क्रं. | तपशील/वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

ब. <u>बचाव पक्ष</u> :-

| अनु क्रं. | निशाणी क्रं. | तपशील/वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

क. <u>न्यायालयाने कागदपत्रांना दिलेल्या निशाणी</u> :-

| अनु क्रं. | निशाणी क्रं. | तपशील/वर्णन |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

(स. श्री. गायकवाड)
प्र. न्यायदंडाधिकारी प्र.वर्ग, न्या.क्रं.१, मोताळा.

ड. भौतिक वस्तु :-

| अनु क्रं. | भौतिक वस्तु | तपशिल |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

दिनांक :- १६/०६/२०२५

स्थळ :- मोताळा.

SATISHKUMAR SHRIPATRAO GAIKWAD
Digitally signed by SATISHKUMAR SHRIPATRAO GAIKWAD
Date: 2025.06.16 17:08:22 +0530

(सतिशकुमार श्रीपतराव गायकवाड)
प्र. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्रं.१,
मोताळा, जिल्हा बुलडाणा.